PUNE RESEARCH TIMES
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES
ISSN 2456-0960
VOL 4, ISSUE 2

# वाङ्मयेतिहासलेखन : काहीं निरीक्षणे

**श्री वैजिनाथ राख**

शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय,

वडगाव बु पुणे ४६ महाराष्ट्र भारत

मराठी वाङ्मयेतिहासलेखनाला ११५ वर्षांची परंपरा आहे. या काळात वाङ्मयेतिहासलेखनाची वाटचाल संख्यात्मक दृष्टीने चांगली झाली आहे. राजवाडे, भावे, पांगारकर यांच्यापासून सुरू झालेली परंपरा आजही दमदारपणे चालू आहे. तरीही काही अपवाद वगळता हे वाङ्मयेतिहास अनेक प्रश्नांची उत्तरे देत नाहीत. त्यामध्ये तोचतोचपणा दिसून येतो. मध्ययुगीन वाङ्मय हे मौखिक परंपरेने आलेले आहे. त्या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण होतात. तत्कालीन वाङ्मयप्रकार का निर्माण झाले? त्यांची वाढ का व कशी झाली? इतके वाङ्मय या काळात निर्माण झाले, तर लुप्त किती झाले असेल? याला काही मर्यादाही आहेत. परंतु यांचा शोध वाङ्मयेतिहासात घेतलेला दिसत नाही. यावर श्री.रं.कुलकर्णी म्हणतात की, ''काळप्रवाहात साहित्याला नवी वळणे का लागली? काही वाङ्मयप्रकार विशिष्ट काळातच का उदयाला आले. या प्रश्नांची चर्चा वाङ्मयेतिहासात सहसा आढळत नाही.''[१] तसेच धर्म—पंथ—संप्रदाय का निर्माण झाले? भक्तिसाहित्याच्या चळवळी का उदयास आल्या? याचे कारण परकीय राजवट आहे, असे काही

वाङ्मयेतिहासकार सांगतात. परंतु मुळातच भारतीय संस्कृती ही 'आध्यात्मिक' आहे. पूर्वीच्या काळात ज्ञानपीठाचे—ज्ञानदानाचे कार्य हे 'संप्रदाय' करत होते. तीच परंपरा पुढे चालत आली का? या सर्वांची उत्तरे या पारंपारिक वाङ्मयेतिहासात काही अंशीच मिळतात.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहासलेखनाचे लेखकांचे काही दृष्टिकोन दिसतात. त्यामध्ये पारंपरिक पद्धतीने भावे, पांगारकर, अ.ना.देशपांडे, शेणोलीकर, नसिराबादकर यांचे वाङ्मयेतिहासलेखन झालेले दिसते. यानंतर सांप्रदायिक वाङ्मयेतिहासात सोनोपंत दांडेकर, भा.पं.बहिरट, रा.चिं.ढेरे, शं.गो. तुळपुळे, अ.का.प्रियोळकर, र.रा.गोसावी, प्र.न.जोशी इत्यादी नावे सांगता येतील. जरासा वेगळा व परंपरा मोडून वैचारिक व तात्त्विक अंगाने गं.बा. सरदार, बा.र.सुंठणकर, वि.भि.कोलते, न्या.रानडे यांचे लेखन आपल्याला पाहयला मिळते यात कोणाचा समाजशास्त्रीय, तर कोणाचा मार्क्सवादी, ऐतिहासिक दृष्टिकोन पाहायला मिळतो. रा.श्री.जोग, स.गं.मालशे, शं.गो. तुळपुळे यांनी संपादित केलेल्या वाङ्मयेतिहासात समग्रलक्ष्यी दृष्टी डोकावताना दिसते.

मध्ययुगीन वाङ्मयेतिहासलेखकांनी विशेषत: कालखंड, लेखक व राजवट यांना डोळ्यांसमोर ठेवून समग्रलक्ष्यी वाङ्मयेतिहासलेखन करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु वाङ्मयेतिहासलेखन हा विषय असा आहे की, कितीही जुळवले तरी शिल्लक काहीतरी राहतेच. कारण वाङ्मयेतिहास म्हणजे एक प्रकारे समाज, संस्कृतीचाच कालबद्ध लेखनक्रम असतो. यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रांतील नामवंतांकडे वाङ्मयेतिहास लिहून घेण्याची कल्पना निघाली. त्याबद्दल रा.श्री.जोग म्हणतात की, ''एकाच व्यक्तीने लिहिलेल्या साहित्येतिहासाला एकसंध दृष्टीचा लाभ होतो. परंतु एकच व्यक्ती साऱ्याच साहित्यप्रकारांत सारखीच अधिकारी असण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे विविध साहित्यप्रकारांना योग्य तो न्याय मिळेलच अशी खात्री नसते. एकाहून अधिक व्यक्तीने लिहिलेल्या साहित्येतिहासात हा धोका कमी संभोवतो. पण अनेक हाती झालेल्या इतिहास लेखनात सुसूत्रतेला धक्का पोहचण्याची

शक्यता नाकारता येत नाही.''[२] म्हणजे वैयक्तिक व संपादकीय या दोन्ही अंगांनी वाङ्मयेतिहास लिहिला, तरी फायदे व तोटे आहेतच, असे म्हणता येईल.

लेखक कितीही निरपेक्ष असला, तरी त्याच्या विचारांचा प्रभाव हा वाङ्मयेतिहासलेखनावर असतोच, तरीही मध्ययुगीन काळातील वाङ्मय संशोधन करून लेख, शिलालेख, ताम्रपट, ऐतिहासिक दस्तावेज, हस्तलिखिते यांच्या आधारे हा वाङ्मयेतिहास सिद्ध करून दाखविला. हे कठीण काम सर्व वाङ्मयेतिहासकारांनी या वाङ्मयाचे तात्त्विक अधिष्ठान उलगडून दाखवून पूर्ण केले, हे कार्य खरोखच मोठे आहे.

वाङ्मयेतिहासात नेहमी बदल होतो. त्या प्रमाणे या सर्व वाङ्मयेतिहासातून एकत्रित शोध व संशोधन करून सर्वांचा एकच समग्रलक्ष्यी व परिपूर्ण वाङ्मयेतिहास लिहिला, तर मध्ययुगीन वाङ्मयाचे व कालखंडाचे अनेक पैलू आपल्यासमोर येतील.

## संदर्भ

१. श्री. रं. कुलकर्णी, 'मध्ययुगीन मराठी साहित्य एक पनर्विचार', राजहंस प्रकाशन १९९५, पृ. क्र. १६.

२. वसंत स. जोशी (संपा), 'भाषा व साहित्य : संशोधन' भाग एक — म.सा.प. पुणे, प.आ. १९८१, पृ. क्र. ४२२.